# जिल्हाधिकारी लातूर यांचे कायोलय

( राजशिष्टाचार व संकीर्ण विभाग )

---

**जिल्हाधिकारी कार्यालय ( नविन प्रशासकीय इमारत ) येथील उपहारगृह ची ई - निवीदा ची अधिसुचना २०१७**

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी कार्यालय ( नविन प्रशासकीय इमारत ) येथील उपहारगृह ची ई - निवादा ऑनलाईन पध्दतीने (E-Tender) व्दारे मागविण्यात येत आहेत. सदरील निविदेचा सविस्तर तपशील हा संकीर्ण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर आणि लातूर जिल्हयाच्या http://latur.nic.in/ यावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जाहीर ई - निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन व्दारे दिनांक २४/१०/२०१७ ते ३१/१०/२०१७ या कालावधीत भरणा करावी लागेल. ई-निविदा बाबतच्या सुचना सदरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ई- निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील. E-Tender यामध्ये जी रक्कम जास्त असेल त्याची निविदा अंतीम करुन त्यांचेसोबत दोन वर्षाकरीता क़रारनामा करण्यात येईल. अधिक माहीतीसाठी कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०२३८२२२०२०४ हा आहे.

दिनांक २३/१०/२०१७

ठिकाण लातूर

( जी. श्रीकांत )

जिल्हाधिकारी लातूर

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

( राजशिष्टाचार व संकीर्ण विभाग )

---

**जिल्हाधिकारी कार्यालय ( नविन प्रशासकीय इमारत ) येथील उपहारगृह ची ई - निवीदा ची अधिसुचना २०१७**

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी कार्यालय ( नविन प्रशासकीय इमारत ) येथील उपहारगृह ची ई - निवादा ऑनलाईन पध्दतीने (E-Tender) व्दारे मागविण्यात येत आहेत. सदरील निविदेचा सविस्तर तपशील हा संकीर्ण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर आणि लातूर जिल्हयाच्या http://latur.nic.in/ यावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जाहीर ई - निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन व्दारे दिनांक .२४/१०/२०१७ ते ३१/१०/२०१७ या कालावधीत भरणा करावी लागेल. ई-निविदा बाबतच्या सुचना सदरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ई- निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील. E-Tender यामध्ये जी रक्कम जास्त असेल त्याची निविदा अंतीम करुन त्यांचेसोबत दोन वर्षाकरीता करारनामा करण्यात येईल.

- **E-Tender चे वेळापत्रक**

| Process | Date | Process | Date |
|---|---|---|---|
| Publish Date | 24.10.2017 01.00PM | Bid Opening Date | 01.11.2017 03.00 PM |
| Document Download and Sale Start Date | 24.10.2017 01.00PM | Document Download and Sale End Date | 31.10.2017 02.00PM |
| Bid Submission Start Date | 24.10.2017 01.00PM | Bid Submission End Date | 31.10.2017 02.00PM |

- **ई निविदा (E-Tender ) मध्ये भाग घेण्याकरीता आवश्यक पात्रता:-**
  - आधार कार्ड ची प्रत
  - नियमित आयकर भरीत असल्याचा पुरावा (मागिल ०२ वर्षाचे आयकर रिटर्न दाखल केल्याची छायांकीत प्रत)
  - पॅन कार्डाची प्रत.
  - तहसिलदार यांचे खादयगृह (हॉटेल) परवाना
  - अन्न व औषध प्रशासन लातूर यांचे नाहारकत प्रमाणपत्र
  - शॉप अॅक्ट नोंदणी परवाना
  - Digital Signature (With Encryption & Decryption)
  - विक्रिकर विभागाकडील GST क्रमांक नोंदणी प्रमाणपत्र.
  - निविदा अर्ज शुल्क रु १०००/-
  - लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला रुपये ५०,०००/- अनामत रक्कम म्हणून (EMD) ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.
  - ऑनलाईन पेमेंट मोडव्दारे पैसे जमा करण्याकरीता राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असणे आवश्यक आहे तसेच सदरील खात्यावर डेबीट कार्ड/एटीम कार्ड किंवा क्रिडीट कार्ड किंवा नेट बॅकींगची सुविधा असणे आवश्यक आहे.

## अटी व शर्ती

१. निविदा भरणा करणा-यांनी तांत्रिक व व्यापारी लिफाफे त्यामध्ये आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करुन डीजीटल सिग्नीचर च्या सहाय्याने सील ऑनलाईन पोर्टल वर सिल करावीत.

२. तांत्रिक व व्यापारी सिलबंद दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफयात ठेवुन तो लिफाफा सिलबंद करुन ऑनलाईन पोर्टल https://mahatenders.gov.in सादर करावीत.

३. ज्याची निविदा मंजूर करण्यात येईल त्यास रुपये १००/- च्या मुद्रांकावर अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा करुन दयावा लागेल व सुरक्षा ठेव म्हणून इएमडी पोटी भरणा केलेली रक्कम या कार्यालयाकडे निविदा संपेर्यंत जमा राहील. निविदाधारकाने अटी व शर्तीचा भंग केल्यास सुरक्षा रक्कम जप्त करुन निविदा रद्द करण्यात येईल.

४. उपहारगृहाची स्वच्छता कायम ठेवणे बंधनकारक असेल.

५. आपातकालीन परीस्थितीमध्ये स्वतंत्र अग्नीशमन यंत्रणा ठेवावी लागेल.

६. उपहारगृह मधील उरलेले अन्न व कचरा यांची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

७. उपहारगृहात बालकामगार ठेवू नयेत. तसेच उपहारगृहातील कामगार हे स्वच्छ व निटनेटके असावेत.

८. उपहारगृहाची वेळ सकाळी ९.०० ते सध्यांकाळी ७.०० वाजेपर्यंत अशी राहील. तसेच महत्वच्या वेळी कार्यालयाच्या निर्देशानुसार उपहारगृह कोणत्याही वेळी कोणत्याही दिवशी सुरु करुन सेवा दयावी लागेल.

९. महीलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करावी.

१०. इमारतीचे नुकासान झाल्यास त्याची भरपाई करावी लागेल.

११. निविदा मंजूर झालेनंतर मासिक भाडे महीना संपण्यापुर्वी रितसर लेखा विभाग यांचे निर्देशानुसार शासन जमा करणे आवश्यक राहील.

१२. विदयुत कनेक्शन स्वतंत्र किंवा सबमीटर घेऊन त्याप्रमाणे स्वतंत्र बील भरावे लागेल.

१३. तांत्रिक लिफाफयात भरावयाची सर्व कागदपत्रे परीपुर्ण असलेशिवाय व्यापारी लिफाफा उघडला जाणार नाही.

१४. निविदामध्ये उपहारगृह चालक कोणकोणते पदार्थ /पेय देवू शकेल त्याचे वजने/मापे सहीत दरपत्रक सोबत जोडावे हे दरपत्रक निविदा कालावधीसाठी बंधनकारक राहील.

१५. उपहारगृह चालविणेस आवश्यक असलेली परवाने स्वतः संबंधीताने संबंधीत खात्याकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

१६. ज्यांचे नावे उपहारगृह वाटप होईल त्याची अनामत रक्कम जागा सोडेपर्यत तहसिलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचे शासकीय बँक खातेवर जमा राहील.

१७. उपहारगृह भाडे दर महिन्यास पाच तारखेपर्यत (आगावू भाडे) या कार्यालयात भरणा करावे लागेल.

१८. ज्या व्यवसायाकरीता जागेचे वाटप करण्यात आले आहे. त्याच व्यवसायाकरीता जागेचा वापर करावा लागेल. उपहारगृहाचा वापर इतर व्यवसायासाठी करता येणार नाही.

१९. जागेचा वापर परवान्याचे मुदती पुरताच म्हणजे दोन वर्षाकरीताच राहील. मुदत संपताच ताबा घेण्याचा रास्त अधिकार या कार्यालयास राहील. ताबा मागण्यासाठी कसलीही नोटीस अगर सूचना देण्यात येणार नाही मुदत संपताच हा करार आपोआपच रद्द होईल.

२०. ठरलेल्या मुदतीच्या आत उपहारगृह न चालवता सोडले तर भरलेली अनामत सुरक्षा रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल.

---

२१. उपहारगृह ज्या व्यक्तीच्या नावे वाटप करण्यात येईल ते त्यांनी स्वतः चालवावी लागेल सदरील जागा वापरासाठी कोणत्याही प्रकारचे पोट भाडेकरु अथवा कुठल्याही मार्गाने हस्तांतर करता येणार नाही. तसे अढळून आल्यास हा करार रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाकडे राहील व अनामत रक्कम जमा करण्यात येईल. कंत्राटदार यांचेविरुध्द नियमानुसार पुढील कारवाइ करण्यात येईल.

२२. या कार्यालयाच्या लेखी परवानगीशिवाय सदरील जागेत तात्पुरते व कायमस्वरुपी बदल किंवा बांधकाम करता येणार नाही.

२३. इमारतीचा वापर करते वेळी इमारतीस नुकसान पोहचेल अगर बाजूच्या लोकांना त्रास होईल अशा प्रकारे वापरता येणार नाही.

२४. उपहारगृहा मधील साहित्य व सामान उपहारगृहाच्या आतच ठेवून व्यवसाय करावा लागेल. दुकानाच्या बाहेर विक्रीसाठी किंवा इतर करणासाठी साहित्य ठेवल्यास अतिक्रमण समजून जप्त करण्यात येईल.

२५. उपहारगृहा मधील खादय पदार्थ नेहमी करीता स्वच्छ,ताजे व शुध्द तेल/तुप या मध्येच करावे लागतील आरोग्याला हानीकारक असे खादय पदार्थ ठेवता येणार नाहीत.

२६. उपहारगृह चालविण्यासाठी फक्त जागाच या कार्यालयाकडून देण्यात येईल. इमारतीला शोभेल असे अदयावत पध्दतीचे फर्निचर स्वतः संबंधीत बनवून घ्यावे लागेल व उपहारगृह चालू करण्यापूर्वी ते योग्य असले बाबत कार्यकारी अभियंता यांना दाखवून मंजूर करुन घेवूनच सुरु करावे लागेल व त्या फर्निचरची मालकी संबंधीताची राहील.

२७. वरील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कोणतीही नोटीस न देता मुदतपूर्व करार रद्द करणेचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

२८. निविदा कोणतेही कारण न दाखवता रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

२९. अंमली/मादक पदार्थ उपहारगृहात ठेवता येणार नाही. तसेच सदरील उपहारगृहामध्ये पान, तंबाखू, सुपारी वगैरे ठेवता येणार नाही.

३०. पाणी व विदयुत बिलाचा भरणा संबंधीत खात्याकडे परस्पर भरणा करुन तसे या कार्यालयास कळवावे लागेल.

३१. दरपत्रक निवीदा मंजूर झाले नंतर निविदाधारकास उपहारगृह नियमानुसार चालविणेसाठी चे आवश्यक ते सर्व परवाने , प्रमाणपत्र , नाहारकत इत्यादी संबधित शासकीय यंत्रणाकडून स्वतः प्राप्त करुनच उपहारगृह सुरु करता येईल.

(जी. श्रीकांत)
जिल्हाधिकारी,लातूर